Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

Original Article

भारतीय प्रजासत्ताकाचे अमृत महोत्सवी आकलन

डॉ भगवान लोखंडे
द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा जि.रायगड
Email: bmllokhande13578@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-171024
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 10(I)
Pp. 119-124
October 2025
Submitted: 18 Sept. 2025
Revised: 29 Sept. 2025
Accepted: 12 Oct. 2025
Published: 31 Oct. 2025

सारांश:

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण 2022 सालापासून साजरा करतो आहोत. 2025 हे वर्ष भारतीय प्रजासत्ताकाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. वास्तविक स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवापेक्षाही भारतीय प्रजासत्ताकाचा सुवर्ण महोत्सव ख़ऱ्या अर्थाने भारतीयांची स्वातंत्र्योत्तर काळातील लोकशाही प्रती असणाऱ्या संवेदना, बांधिलकी व भविष्याची दृष्टी व्यक्त करण्याच्या साठी महत्त्वाचा ठरतो. कारण 1950 च्या दशकात आफ्रिका व आशिया खंडातील बहुसंख्य देशांना स्वातंत्र्य मिळाले.परंतु मिळालेले ते स्वातंत्र्य बहुसंख्य देशांना टिकवता आले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवळजवळ सर्वच देशांनी लोकशाही शासनपद्धतीचा अंगीकार केला मात्र त्या देशांमध्ये लोकशाही ही अतिशय अल्पकाळापुरतीच पाहुणी म्हणून राहिली व परत ते देश निरंकुश शासन पद्धतीच्या वेगवेगळ्या प्रारूपांचे बळी ठरले.भारत हा एकमेव असा देश आहे ज्या देशाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रजासत्ताकाची स्थापना केली व हे प्रजासत्ताक आज दिमाखाने अमृत महोत्सवी वर्षांमध्ये प्रवेशित झाले आहे. भारतीय प्रजासत्ताकाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात भारतीय संविधानाचे यश, भारतीय संविधानाची वाटचाल व भारतीय प्रजासत्ताकाचे भविष्य या दृष्टीने सातत्यानं विचारमंथन,तत्वचिंतन, आकलन व समाजाच्या विविध स्तरांवर या दृष्टीने संवाद वृद्धिगत होणे महत्त्वाचं आहे. भारतीय संविधान हे केवळ एक नियमांचे पुस्तक नव्हे किंवा कायद्यांची चौकट नव्हे तर तो आपल्या क्रांती नायकांनी आपल्या हाती दिलेला एक क्रांतिकारी दस्तऐवज आहे. हा क्रांतिकारी दस्तऐवज दोन वर्ष 11 महिने आणि 17 दिवसांच्या कालावधीत भारतीय संविधान सभेने मूर्त स्वरूपात आणला असला तरी त्याचे संचित एवढ्या पुरते मर्यादित करून चालणार नाही. त्याचा तत्व वैचारिक स्त्रोत बुद्धकालीन गणराज्यापासून भारतीय स्वातंत्र्यलढ्यापर्यंत भारतीय समृद्ध विचार परंपरांना आपल्या कवेत घेतो. तर संरचनात्मक स्त्रोत ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटी पासून भारतीय स्वातंत्र्य कायद्यापर्यंत आपला उगम दाखवीतो. आपला परिप्रेक्ष 60 पेक्षा अधिक देशांच्या राज्यघटनेच्या अभ्यासातून मानवी हक्कांच्या सनदे पर्यंत विकसित करतो. अशा पद्धतीने भारतीय संविधान हे सभोवतालच्या परिस्थितीतून जे जे सकस आहे ते आत्मसात करत आकाराला तर आलेच त्याचबरोबर जगभरातील विविध संविधानातील मूलभूत तत्त्वांनाही त्यांनी आपल्या कवेत घेतले व सबंध जगाला मार्गदर्शन करू शकेल असे संविधानाचे प्रारूप तयार झाले.

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
OPEN ACCESS

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. भगवान लोखंडे, द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा जि.रायगड

How to cite this article:
भगवान लोखंडे,2025). भारतीय प्रजासत्ताकाचे अमृत महोत्सवी आकलन, Journal of Research & Development, 17(10(I)), 119-124.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

त्यामुळे भारतीय संविधानाचे तत्वज्ञान हे जगातील आदर्श समाज जीवनाचे स्वप्न प्रत्यक्षात आणू पाहणाऱ्या कोणत्याही समूहास, राष्ट्रास मार्गदर्शक ठरू शकेल एवढी उंची त्याने गाठली आहे. या दृष्टीने या शोधनिबंधात मांडणी करण्यात आलेली आहे.

प्रास्ताविक

भारतीय संविधान स्वीकार व अंमलबजावणीच्या दिवसापासून जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आजतागायत आहे.लवचिकतेच्या दृष्टीने भारतीय संविधानाने अंशतः लवचिक व अंशतः परिदृढ स्वरूप स्वीकारलेले आहे. जनतेचे सार्वभौमत्व, संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार, समाजवादी,धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य, मूलभूत हक्क व मूलभूत कर्तव्यांची तरतूद, संघराज्य शासन व्यवस्थेचा स्वीकार, न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या तत्त्वाचा अंगीकार ही भारतीय संविधानाची मूलभूत स्वरूपाची वैशिष्ट्ये जगभर मान्यता प्राप्त झालेली दिसतात.भारतीय संविधानाने भारतीय स्वातंत्र्याच प्रजासत्ताकात रूपांतर करून व्यक्तीच्या नागरिकत्वाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे व एक लोकशाही प्रति सामाजिक मन व समाजाची लोकशाही नजर बनविण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले.ज्यातून संविधानिक राष्ट्रवादाची उभारणी होत लोकशाही संस्थांची मूळ व लोकशाही प्रक्रिया स्वतंत्र भारतामध्ये रुजण्यास मदत झाली. भारतीय संविधानाने भारतीयत्वा च्या अस्मितेचा नवा अविष्कार भारतीयांना देताना त्यांचे स्वत्व किंवा त्यांच्या प्रिय गोष्टींचा त्याग करण्याची सक्ती केली नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर विविध देशांमध्ये जे फुटीचे लोन पसरले तसे भारतामध्ये फुटीर प्रवृत्ती एका मर्यादेच्या पलीकडे आपले डोके वर काढताना दिसत नाही. भारतीय संविधानाने मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्य यांच्या बरोबरीने मार्गदर्शक तत्वांचा आधार घेत भारतीय नागरिकत्वाच्या प्रक्रियेला वेग दिला व त्याचबरोबर राज्यकर्त्यांना धोरणात्मक तत्वांची, भारतीय संविधानाची संविधानिक नीतिमत्ता ही बाळगण्यास प्रवृत्त केले.स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संसदीय लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार करणे हा पाश्चात्य विचार समूहांसाठी एक धक्का होता. मात्र त्याहीपेक्षा भारतीय संविधानात सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार व समान विस्तार हा विचारही पाश्चात्य समाज राज्यकर्ते व तत्वज्ञ यांना पचवणे जड जात होते. कारण सामाजिक, आर्थिक, भौतिक ,राजकीय अशा सर्वच पातळ्यांवर आपण दारिद्र्याच्या उच्च टोकावर होतो .पाश्चात देश व समाज समूह यांच्याबरोबर आपली या अर्थाने कोणतीही बरोबरी होणे शक्य नव्हते. पाश्चात्य देशांनी अगदी इंग्लंडपासून अमेरिकेपर्यंत व स्वित्झर्लंड पासून न्यूझीलंड पर्यंत सर्वांनीच सार्वत्रिक प्रौढ मताधिकारचा विस्तार लोकशाही मूल्य, हक्क व अधिकार यांचे टप्प्याटप्प्याने वितरण केले होते . हे हक्क व अधिकारांचे वितरण दीर्घकाळ चालले. काही शतकांचा कालावधी त्यासाठी पाश्चात्य देशांनी घेतला होता. भारतीय संविधानकारांनी मात्र पहिल्याच दिवशी हक्क व अधिकारांचे समान माप सर्व भारतीयांना प्रदान केले. त्यामुळे आपण सामाजिक सांस्कृतिक आर्थिक राजकीय व भौतिक दृष्टीने पाश्चात्यां पेक्षा अनेक शतकांनी मागे असलो तरी आधुनिक विचारांच्या, लोकशाही विस्ताराच्या दृष्टीने मात्र भारतीय संविधानकारांनी पाश्चात्तांना मागे टाकले. त्यामुळे पाश्चात्य देशांच्या, भारतीय लोकशाहीच्या भवितव्याविषयीच्या प्रतिक्रिया या एखाद्या कामगाराने, सामान्य शेतकऱ्याने, दलित वंचित समूहातील एखाद्या निर्धन व्यक्तीने कार घ्यावी व त्यातून विहाराचा आनंद घ्यावा व सवर्ण श्रीमंत व्यक्तीला मात्र ते करण्याचे धाडस होऊ नये त्यावेळी त्या निर्धन व्यक्तीविषयीची,त्याच्या भवितव्याविषयीची तथाकथित श्रीमंत समूह व्यक्तींची जशी प्रतिक्रिया असते की हा गाडीचे हप्ते कसे भरेल? फायनान्स वाले गाडी ओढून नेतील,यात पेट्रोल डिझेल टाकण्याची याची ऐपत नाही,खायला घरात पीठ नाही आणि गाडीतून फिरतो, तसेच काहीसे पाश्चात्य विचारवंत भारतीय संविधान, भारतीय राज्यव्यवस्था याविषयी आपल्या प्रतिक्रिया देत होते. भाकिते व्यक्त करीत होते.या सर्व भाकितांना खोटे ठरवून भारतीय लोकशाहीच्या विस्ताराचा भारतीय संविधानकारांनी जो श्रीमंत मनाने विचार केला होता त्याचे प्रतिनिधिक प्रतिक्रियेचे स्वरूप संविधान सभेचे अध्यक्ष यांच्या आशावादातून व्यक्त होते.राजेंद्र प्रसाद म्हणाले होते." हा प्रौढ मताधिकार शहाणपणाचा आहे की नाही याविषयी काही लोकांना शंका आहे पण मला त्याबद्दल काही खेद वाटत नाही. हा एक प्रयोग आहे आणि त्याचे परिणाम आज कोणीच सांगू शकत नाही. मला खेड्यातील लोक चांगले माहित आहेत आणि तेच उद्याचा मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर असणार. या खेडूतानां चांगले व्यवहार ज्ञान व बुद्धिमत्ता असते.त्यांची एक बलिष्ठ संस्कृती ही आहे. शहरी पंडितांना ती जरी मान्य नसली तरी त्यांच्यात पुष्कळ गुण आहेत.या खेडूताना लिहिण्या वाचण्याची कला अवगत नसली तरी त्यांना साऱ्या गोष्टी नीट समजावून दिल्या तर आपल्या राष्ट्राच्या हिताचे काय आहे याचा अचूक निर्णय ते घेऊ शकतात. शहरातील कामगारांपेक्षाही खेड्यातील शेतकरी काही वेळा अधिक शहाणा दिसतो याचे कारण कारखान्यातील मजूर तो चालवीत असलेल्या यंत्राचाच एक भाग बनतो आणि त्यामुळे स्वत्व विसरतो.म्हणून माझी अशी खात्री आहे की, जर खेडूतानां साऱ्या गोष्टी समजावून दिल्या तर निवडणुकीचे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

तंत्र ते आत्मसात करतील.एवढेच नव्हे तर आपले मत शहाणपणाने देतील. त्यांच्यामुळे आपल्या भवितव्याला काही धोका नाही. मात्र काही लोक निरनिराळ्या घोषणा करून व व्यवहार्य कार्यक्रमाची सुंदर चित्र रेखाटून त्यांची मने बिघडविण्याचा संभव आहे. तरीसुद्धा आपल्या खंबीर व्यवहार चातुर्याने खेडूत योग्य काय ते बरोबर ओळखतील. यामुळे आपण अशी साधारण आशा बाळगू शकतो की,आपल्या विधिमंडळातील प्रतिनिधींना जनतेचा खरा पाठिंबा असेल आणि देशाची वस्तुस्थिती माहीत असेल "डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा विश्वास सर्वसामान्य भारतीयांनी स्वातंत्र्योत्तर काळात सार्थ करून दाखविला. डॉ बाबासाहेब आंबेडकर लॉर्ड साउथबेरो कमिशन ला दिलेल्या साक्षी पासून भारतामध्ये व्यापक स्वरूपाच्या सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासाठी आग्रही होते. वेळोवेळी आलेले ब्रिटिश कमिशन,गोलमेज परिषद व संविधान सभेतही बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा आग्रह धरलेला होता.संविधान सभेत बोलताना ते म्हणाले की कोणत्याही कारणावरून सर्वसामान्य भारतीय लोकांना सार्वत्रिक प्रौढ पदाधिकारापासून वंचित ठेवले तर ते परत त्यांना अधिकार कधीच मिळणार नाहीत. म्हणून कोणत्याही परिस्थितीत कोणीही भारतीय सार्वत्रिक प्रौढ मताधिकारापासून वंचित राहू नये.' त्यामुळेच सर्वसामान्य लोकांना या विश्वासास पात्र होण्यासाठी आवश्यक पाठबळ भारतीय राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून सातत्याने मिळत गेले. त्यातून लोकशाहीचा विकास व विस्तार होण्यास मदत झाली.

संशोधन विषयाचे महत्त्व

लोकशाही हा विचार व मूल्य या अर्थाने एक प्राचीन तत्व आहे.ग्रीक नगर राज्य,भारतातील बौद्धकालीन गणराज्य यामध्ये या पद्धतीच्या शासन व्यवहारांचे,व्यवस्थांचे संदर्भ मिळतात. मात्र आधुनिक अर्थाने लोकशाही राजकीय व्यवस्थांचा विकास व इतिहास अवलोकन करताना एक बाब प्रकर्षाने आढळते की लोकशाहीचा विकास व विस्तार ही निरंतर चालत आलेली प्रक्रिया नसून लोकशाही प्रवाहाच्या लाटा इतिहासामध्ये आलेल्या दिसतात.यातील पहिली लाट अठराव्या शतकात युरोपीयन देशांमध्ये आली. दुसरी लाट विसाव्या शतकाच्या मध्यावर आशिया आफ्रिका खंडातील वसाहतवादातून स्वातंत्र्य प्राप्त केलेल्या देशांमध्ये आली.तिसरी लाट 1990 च्या दशकात सोव्हियत रशियाचे विघटन झाल्यानंतर सोव्हियत रशियाच्या प्रभावातून मुक्त झालेल्या देशांमध्ये लोकशाहीची तिसरी लाट आली तर चौथी लाट ही एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी अरब देशांमध्ये आली. या चारही लाटांमध्ये लोकशाहीचा विस्तार व स्वीकार मोठ्या संख्येने अनेक राष्ट्रांनी केला मात्र यातील काही मोजक्याच देशांमध्ये लोकशाही निरंतर राहू शकली. लोकशाही निरंतर चालू ठेवण्यात ज्या नेतृत्वाकडे सत्तेची सूत्रे प्रारंभी मिळाली त्यांनी संविधानिक नीतिमत्ता किती प्रामाणिकपणे जपली हा महत्त्वाचा मुद्दा ठरला. या संदर्भात पंडित जवाहरलाल नेहरू यांचे उदाहरण महत्त्वाचे आहे.कॅबिनेट मिशनचा प्रस्तावावर खाजगीत चर्चा करण्याकरिता ज्यावेळी मेजर ऍटली यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना आमंत्रित केले त्यावेळी पंडित नेहरूंनी स्वतःस राजा घोषित करावे व भारताच्या उज्वल सुरक्षित भविष्यासाठी मर्यादित घटनात्मक राजेशाही चा मार्ग स्वीकारावा असा सल्ला दिला होता.मात्र पंडित जवाहरलाल नेहरूंनी तो सल्ला नम्रपणे नाकारला. पंडित जवाहरलाल नेहरू यांची संसदीय लोकशाही वरील निष्ठा व विश्वास भारतीय लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीतील महत्त्वाचा घटक मानावा लागेल.1950 पासून खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीच्या विकासाचा प्रारंभ झाला. सुरुवातीची पिढी हे लोकशाही मूल्यांवर जीवननिष्ठा बाळगणारी होती तरीही त्यांच्या प्रत्येक्ष व्यवहारामध्ये त्यांना काही तडजोडी कराव्या लागल्या त्यातून भारतीय लोकशाही समोर काही प्रश्न प्रारंभीच्या काळापासूनच पुढे आलेले दिसतात.समस्त भारतीय समाजाला क्रियाशील बनवून भारताचा स्वातंत्र्यलढा उभा राहिला होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मात्र या क्रियाशील समाजाला शांत बसवण्याचं पहिलं आव्हान राज्यकर्त्यांसमोर होतं. स्वातंत्र्यानंतर सत्ताधारी झालेल्या राजकीय धोरणांनी विनम्र लोकशाही बनविण्याचा मानस धरलेला दिसतो. विनम्र लोकशाहीचा पहिला आधार म्हणजे लोकांनी कधी सक्रिय व्हायचं, कधी राजकीय सहभाग घ्यायचा, कधी व्यक्त व्हायचं, कधी आंदोलन करायचं, देशाच्या हिताचं नेमकं काय हे सर्व नेत्यांच्या आदेशावरून ठरवायचं. त्यातून नागरिकांच एक प्रकारे वैचारिक अपंगत्व किंवा परावलंबित्व आकाराला येत गेलं. त्यातून नेतृत्व केंद्रीत लोकशाही आकारास येऊ लागली. कायदा व सुव्यवस्थेचा बागुलबुवा 1950 नंतर भारतीय राज्यकर्त्यांनी निर्माण केला व भारतीय लोकांनी आपल्या हक्क अधिकारांची भाषा बोलने म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणं असं गणित पुढे पुढे वाढत गेलं व आज ते राष्ट्रद्रोही टोकापर्यंत पोहोचलेलं दिसतं. आज आपल्या हक्कांची भाषा बोलणं म्हणजे राष्ट्रद्रोह ठरवला जातो आहे .हे त्याच प्रक्रियेचं पुढचं विकसित स्वरूप मानावं लागेल. कायदा व सुव्यवस्थेच्या पुढे नागरिकांच्या मूलभूत अधिकाराना दुय्यम स्थान प्राप्त होत गेलेलं दिसतं. कायदा व सुव्यवस्था आणि लोकांची अधिकारांची मागणी यांचा समन्वय साधन, यांचा मेळ घालणं यात प्रारंभी पासूनच राज्यकर्ते हे अपयशी ठरलेले दिसतात. त्यातून

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

भारतीय लोकशाहीत एक परंपरा सुरू झाली.' गजर लोक या शब्दाचा करायचा आणि प्रभाव सरकारी बडेजावचा ठेवायचा. 'स्त्रियांच्या बाबतीत जशी दुटप्पी भूमिका धर्मव्यवस्थेने घेतली तसीच लोकशाही व्यवहाराच्या संदर्भात सामान्य लोक व अभिजन यांच्या मध्ये सामान्य लोकांच्या वाट्याला ही दुटप्पी भूमिका आलेली दिसते. भारतीय लोकशाहीत व्यक्तीला समूह म्हणून महत्त्व प्राप्त होत गेले. त्यातून एका व्यक्तीच्या नागरिकत्वाचा सन्मान किंवा स्वतंत्र व्यक्तींच्या विचारांचा सन्मान हा सामाजिक व राजकीय जीवनातून उत्तरोत्तर हद्दपार होत असलेला दिसतो.

संशोधन विषयाचे समस्या

भारतीय लोकशाहीत प्रारंभीच्या काळापासून दोन प्रकारच्या हिंसा ना कसं सामोरे जायचा हा महत्त्वाचा प्रश्न राहिलेला दिसतो.त्यातील एक हिंसा ही व्यक्ती किंवा व्यक्ती समूहांना केलेले हिंसा होय. जी प्रामुख्याने ईशान्य भारतीय राज्यांमध्ये अस्तित्वात होती तर दुसरी हिंसा ही जातीय व्यवस्थेच्या माध्यमातून समाज व्यवस्थेत केली जाते .या दोन्ही हिंसांचं काय करायचं किंवा त्यांचं शमन कसं करायचं हा एक मूलभूत प्रश्न भारतीय राजकीय व्यवस्थेत होता. समाज व्यवस्थेत जे प्रश्न आहे ते सोडवायचे की दडपून टाकायचे हाही प्रश्न भारतीय राजकीय व्यवस्थेत प्रारंभा पासून असलेला दिसतो. एकंदरीत तात्विक पातळीवर लोकशाही मूल्यांचा उदो उदो व व्यवहारिक पातळीवर त्याच मूल्यांची फारकत अशी व्यवस्था प्रारंभीच्या काळीच सुरू झालेली होती. दुसरीकडे सामाजिक परिघाच्या बाहेर असलेल्या वंचित समूहांच्या संदर्भातही तात्विक पातळीवर काव्यात्मक सामाजिक न्यायाची मांडणी व उद्घोष केला जात होता. परंतु प्रत्यक्षात सामाजिक न्यायासाठी प्रशासकीय यंत्रणा कशा कार्यान्वित होत्या याचा आढावा घेतला तर त्यात विसंवाद मोठ्या प्रमाणात आढळतो. 1975 साली लागलेली आणीबाणी ही संविधानिक तरतुदींचा आधार घेऊनच, गैरवापर करून लादण्यात आली होती आणि त्यामुळे काही काळ लोकशाही निलंबित झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु हा प्रयोग जेमतेम दीड वर्षेच चालला व जनतेने तो प्रयोग सरकारला मागे घ्यावयास भाग पाडले. यादरम्यानच्या काळात आणीबाणीचा वापर जर कोणी केला असेल तर तो प्रामुख्याने प्रशासन आणि पोलीस यंत्रणेने केला. कायदेशीर कोणत्याही तरतुदी नसणाऱ्या गोष्टींचा त्यांनी गैरवापर किंवा अंमलबजावणी केली जी खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक होती .परंतु त्यावर टीकाकार फारसं भाष्य करताना दिसत नाहीत. लोकशाही मार्गाने लोकशाहीचा गळा घोटला जाऊ शकतो. हे आणीबाणीच्या माध्यमातून पहिल्यांदा भारतीयांना अनुभवास आले. 1975 नंतर साधारणता दर दहा वर्षांनी भारतीय लोकशाही आडवळणाने चुकत गेलेली दिसते. 1984 साली शिखांची झालेली कत्तल, 1992 साली झालेला बाबरी मशिदीचा विध्वंस, ,2002 साली झालेली गुजरातची दंगल ही त्याची काही उदाहरणे आहेत. 1975 साली इंदिरा गांधींचा रस्ता चुकला त्याची राजकीय शिक्षा जनतेने त्यांना दिली. परंतु त्यानंतर रस्ता चुकलेल्या नेत्यांना जनतेने कोणतीही शिक्षा दिलेली दिसत नाही बुलेट बक्षीस मिळालेले दिसते आणि त्यामुळे केवळ लोकशाहीत नेतेच चुका करतात असं नव्हे तर नेत्यांच्या चुकांकडे कानाडोळा करणारे नागरिक, मतदार ही तेवढेच चुकीचे किंवा गुन्हेगार असतात.

भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने आणखी एक मूलभूत समस्या म्हणजे कार्यपद्धतीचं रूपांतर एका बाजूने आपण किचकट नोकरशाहीमध्ये केलं आणि दुसऱ्या बाजूला राजकीय सहभागाच रूपांतर समारंभांमध्ये आणि उत्सवांमध्ये शोधलं. यातून भारताची राज्यसंस्था प्रबळ बनली व नागरिकांना दमन करण्याची शक्ती तिच्यात अधिक वाढली. संविधानिक संस्थांच होणारा अवमूल्यन, त्यातील गैर प्रवृत्ती याही भारतीय लोकशाही मधील महत्त्वाचे पेचप्रसंग निर्माण करताना दिसतात. पीएमओ मध्ये झालेल सत्तेचं केंद्रीकरण, पंचायतराज व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या व्यवस्थेतून राज्यांना मिळालेली दुय्यम भूमिका आणि राजकीय पक्षांमधील मधील घराणे शाही यामुळे हे प्रश्न अधिकच जटिल बनलेले दिसतात. निवडणूक आयोग,सर्व तपास यंत्रणा सार्वजनिक प्रशासन, सत्ताधारी वर्गासाठी वापरले जात असेल तर लोकशाहीचा आशय सजीव होऊ शकत नाही. त्यामुळे लोकशाहीचा विपर्यास होण्याची प्रक्रिया सुरू झालेली दिसते.

लोकशाहीचा विपर्यास प्रामुख्याने तीन मार्गांनी होताना दिसतो. आहे .त्यातील एक मार्ग आहे पॉपिल्यालिझम ज्याला विभूती मत्त्वाचे तत्वापलीकडची संज्ञा म्हणता येईल .यात एक नेता श्रेष्ठ नसतो तर तो सर्वज्ञही असतो. त्याच्या इच्छा आकांक्षांना राष्ट्रवादाचे स्वरूप प्राप्त होते.जे स्वतःला रक्षक म्हणून रस्त्यावर येऊन आपले मूल्य लोकांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करतात त्यांची मुळ प्रेरणा ही पॉप्युलिस्ट प्रेरणा असते.दुसरा विपर्यास हा बहुसंख्यांकवादाच्या मार्गाने होतो. जात, धर्म,भाषा, प्रांत या आधारावर भारतात प्रामुख्याने बहुसंख्यांकवाद वापरला जातो ज्यामुळे लोकशाही प्रक्रिया संकुचित होताना दिसते. हिंदू मुस्लिम वादाला बहुसंख्यांक वादाची जोड मिळालेले दिसते. एखाद्या दुकानात जर एखाद्या वस्तूला ग्राहक वाढत असतील तर आजूबाजूचे दुकानदारही ती वस्तू आपल्या दुकानात

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

ठेवायला लागतात तसंच एखाद्या राजकीय पक्षाला बहुसंख्यांक वादातून यश मिळायला लागलं तर इतरही राजकीय पक्ष आपापलं बहुसंख्यांकवादाचे प्रतिमान विकसित करतात.तीच स्थिती आज भारतीय राजकीय प्रणालीमध्ये दिसून येते आणि त्यामुळे भारतीय लोकशाही हे बहुसंख्यांक वादाचा बळी ठरते की काय अशी स्थिती निर्माण झालेली दिसते. कट्टर हिंदुत्व,सॉफ्ट हिंदुत्व,धर्मनिरपेक्ष हिंदुत्व ही त्याची काही उदाहरणे होत.लोकशाहीचा व्यवहार आज नवीन मूल्यांच्या मांडणीतून होताना दिसतो आहे. प्रामुख्याने लोकशाही हा चांगला शासन प्रकार आहे परंतु राष्ट्राच्या पुढे तो दुय्यम आहे असी मांडणी जोर धरते आहे. पूर्वी राष्ट्र आणि लोकशाही ही एकमेकांना पूरक व एकमेकांच्या हात हातात घेऊन चालणारी बाब मानली जात होती. अलीकडे मात्र लोकशाही व राष्ट्रवाद या परस्पर विरोधी बाबी आहेत की काय अशा पद्धतीचं वातावरण तयार केले जाताना दिसते आहे.

भारतातच नव्हे तर जगभरात अलीकडच्या काळात राज्यसंस्थांनी आपल्याच नागरिकांवर पाळत ठेवण्याची क्षमता प्रचंड वाढवलेली दिसते. 19 वे व 20 वे शतक हे लोकशाहीच्या विकास व विस्ताराचे शतक मानले गेले. परंतु एकविसाव्या शतकात लोकशाहीला अधोगती मिळते की काय अशी स्थिती सध्या तरी जगभर निर्माण झालेली दिसते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे लोकशाही धोक्यात आलेली दिसते. त्यामुळे लोकशाही झुरून ,झुरुन कमी होण्याची भीती शक्यता निर्माण होताना दिसते आहे.

निष्कर्ष

लोकशाहीमध्ये नागरिकांनी विचार करणे थांबवले की नागरिकत्वाचा बकालीकरणाचा प्रारंभ होतो. त्याचं भक्ता मध्ये रुपांतर होते. पुढच्या पिढीला आपल्या पेक्षा अधिक समृद्ध जीवन लाभावे, आपला देश अधिक समृद्ध व्हावा याकरिता नागरिक विचार प्रवण व बांधिलकी बाळगणारा असावा लागतो. आजच्या नागरिकांनी आपल्या हिताचा विचार करणं थांबवून ते दुसऱ्याच्या हातात दिलेले दिसते. त्यामुळे भारतीय लोकशाहीच्या समृद्धीसाठी आजच्या मतदारांचे वर्तन पूरक नाही हे स्पष्ट होते. हक्काच्या जाणिवेतून मेहरबानी च्या जाणीवेकडे मतदारांचा प्रभाव प्रवास सुरू असलेला दिसतो. पहिले पिढी ही हक्काची भाषा बोलत होती म्हणून 1972 च्या दुष्काळात लोक सरकारला भीक नको काम द्या असं म्हणत होते. आज मात्र काम नको आम्हाला जगवा, प्रत्येक गोष्टीसाठी अनुदान द्या असीच नागरिकांची अवस्था निर्माण झालेली दिसते. लोकांनुनयाच्या योजनांचे त्यातून पेव फुटले आहेत. मात्र या खऱ्या कल्याणकारी राज्याच्या योजना म्हणता येणार नाहीत. ज्या समूहांना विषमतेचा झळा जास्त बसतात, जे परिघावरचे आहेत,व्यवस्थेने ज्यांना दूर फेकलेले आहे, ज्यांच्यापर्यंत उत्पादनाची साधन अद्याप पोहोचलेली नाहीत अशा समूहांनी तरी या दृष्टीने परिवर्तन करण्यासाठी आपल्याला मिळालेल्या अधिकाराचा वापर हा निवडणुकीच्या माध्यमातून प्रभावीपणे वापरण्यासाठी कटिबद्ध असणं गरजेचं आहे. आपण मतदानासाठी जे बटन दाबतो त्यातून जो निवडून येतो , जे वास्तव तयार होतं ते आपल्या मतदानातून सुरक्षित राज्य निर्माण करता का? सुसंस्कृत व्यक्ती निवडली जाते का? देशाच्या समृद्धीसाठी, उभारणीसाठी त्याची काही मदत होते का? याचा विचार प्रत्येक मतदारांन करणं गरजेचं आहे. एखाद्या व्यक्तीची उंची हिमालया एवढी वाढली तरी ते महत्त्वाचे नाही समाजाची उंची ही समुद्रसपाटी सारखी असावी तरच समतेचा आणि समतलनाचा विचार त्या समाज जीवनामध्ये रुजू शकतो, वाढू शकतो असं बाबासाहेब म्हणतात. पूर्वीच्या काळी सामान्य कष्टकरी शेतकरी सुद्धा इंटेलेक्च्युअल होता, बुद्धिमान होता. तो आपली पीडा,आपले दुःख, आपले शोषण गीतांमधून म्हणी अशा विविध माध्यमातून व्यक्त करत होता. आजचा बुद्धिजीवी वर्ग ही तेवढी बुद्धिमत्ता, सृजनशीलता, धाडस, अभिव्यक्ती बाळगून असलेला किंवा ती समज तेवढी समृद्ध असलेला दिसत नाही.

उपाय

राजसत्तेला नीतिमत्तेची जोड असल्याशिवाय खऱ्या अर्थानं लोकशाही जिवंत स्वरूप धारण करू शकत नाही. जिवंत लोकशाहीमध्ये लोकांच्या सेवेसाठी मी सत्तेत जाईल हा विचार मध्यवर्ती असतो. त्याचबरोबर मी त्या सत्तेतून बाहेरही पडेल हा विचारही अभिप्रेत असतो. एकच व्यक्ती, एकच कुटुंब किंवा एकच घराण दीर्घकाळ सत्तेत राहणं हे जिवंत लोकशाहीमध्ये अपेक्षित नसतं. मलाच लोकहित कळतं हा भ्रम समाजामध्ये निर्माण करणे जिवंत लोकशाहीसाठी घातक ठरत. जिवंत लोकशाहीसाठी इतरांनाही सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळणे जास्त महत्त्वाचं मानलं जातं. मानवतेची सर्वकालिक तत्त्व स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, मानवी मूल्य यांच्या संवर्धन व अंमलबजावणी साठी बाबासाहेबांचे अनुयायी म्हणून घेणाऱ्यांनी तरी आपल्या मताधिकाराचा वापर सुज्ञपणे करणे आवश्यक आहे. आपल्या मताधिकाराच्या वापरातून आपण या तत्त्वांच्या वृद्धीसाठी काय करतो आहोत याचे भान त्यात असणे नितांत गरजेचे आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

भारतीय लोकशाही भवितव्याच्या, सध्याच्या वास्तवाच्या व एकूणच वाटचालीच्या दृष्टीने काही शक्यता आकार घेत आहेत. एक म्हणजे भारतीय लोकशाही नाममात्र राहील ती कुठेतरी एका कोपऱ्यात जाऊन बसेल जसं घरात एखाद्या नको असलेल्या व्यक्ती साठी एखादा कोपरा राखून ठेवला जातो तशी अवस्था ती होईल. लोकशाही एक दुर्लक्षित बाब बनेल. संविधान नावापुरतं अस्तित्वात असेल,लोकशाही नावापुरती अस्तित्वात असेल. लोकशाहीचा गाजावाजा होत राहील परंतु व्यवहारात मात्र लोकशाही मूल्य व लोकशाही तत्त्व अस्तित्वात राहणार नाहीत. लोकशाहीचा स्मारक होईल, त्याचं मंदिर बांधलं जाईल, दैनंदिन त्याचा गजर होईल परंतु सार्वजनिक जीवनातून लोकशाही हद्दपार होईल. आणखी एक शक्यता म्हणजे लोकशाही मागच्या दाराने पळून जाईल. लोकशाही नष्ट होऊन तिच्या जागी दुसरी कुठली तरी शाही घेईल. आम्ही भारताचे लोक हा संकल्प मागील इतिहासाप्रमाणे असाच मध्ये मध्ये जागृत होत राहिला तर कदाचित ही लोकशाही आहे त्या स्थितीत कसेतरी आपली आब राखेल परंतु समकालीन नागरिक, मतदार, राजकीय पक्ष, संविधानिक संस्था, सार्वजनिक प्रशासन व भारतीय संविधानाने दिलेली एकूणच भारतीय शासन व्यवस्थेची अंगे, प्रसार माध्यमे यांचा प्रत्यक्ष व्यवहार हा फारसा संविधानवर्धक नाही. भारतीय संविधानाने भारतीयत्वासाठी कुठल्याही भारतीय नागरिकाला त्याच्या प्रिय गोष्टींचा त्याग करण्याची शक्ती केली नाही म्हणूनच भारत हा आजतागायत अखंड राहिला. परंतु समकालीन परिस्थितीत आपल्या प्रिय गोष्टींचा भारतीयत्वासाठी त्याग करण्याची सक्ती राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली प्रामुख्याने केले जाताना दिसते आहे. 'इस देश मे रहना होगा तो वंदे मातरम बोलना होगा' हा त्याचाच एक अविष्कार आहे.भारतीय प्रजासत्ताकाच्या अमृत महोत्सवी वर्षात केवळ विवेचन, विश्लेषण आशावादी असून चालत नाही ते नेहमीच चिकित्सक असावं लागतं. प्रजासत्ताकाच्या बांधिलकीसाठीच आपली कृती मात्र अशावादी असणं आवश्यक आहे.लोकशाहीची जपणूक करणं महत्त्वाचं असतं, ते नागरिकांचे प्रथम कर्तव्य असतं तरच लोकशाही निर्वेध पणे कार्यरत राहू शकते. विसाव्या शतकात लोकशाही मान वर करून अभिमानाने चालत होती त्याच लोकशाहीला 21व्या शतकात मान खाली घालून जायला लागते आहे. राज्यकर्त्यांच्या दबावाखाली ती वावरत आहे. 'लोकशाही कशा मृत होतात' या ग्रंथात याचे विश्लेषण करताना असे म्हटले गेले आहे की त्यांच्यावर बाहेरून हल्ला होत नाही आतूनच त्यांच्या मृत होण्याची प्रक्रिया सुरू होते. भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ही बाब प्रकर्षाने प्रत्ययाला येत आहे.'लोकशाही कशी मारावी' देवाशीस रॉय यांनी हे पुस्तक लिहिले आहे. यामध्ये लोकशाहीचा उत्सव करून लोकशाही मूल्य सार्वजनिक जीवनातून हद्दपार करण्याची प्रक्रिया अधोरेखित केलेली दिसते.भारतीय प्रजासत्ताकाच्या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय प्रजासत्ताकाच्या उज्वल भविष्यासाठी राज्यकर्त्यांचाच पाय घसरत असेल तर मतदारांनी त्यांना योग्य वळणावर घेऊन जाणे, त्यांना त्यासाठी कृतीबद्ध राहण्यासाठी कटीबद्ध करणं महत्त्वाचं असतं. नम्र लोकशाही, पा ॅपुलॅलिझम, बहुसंख्यांकवाद, कायदा व सुव्यवस्थेचा बागुलबुवा, सांस्कृतिक राष्ट्रवाद या सारख्या मार्गातून लोकशाहीची होणारी गळचेपी थांबविण्यासाठी भारतीय स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवात सर्व भारतीय नागरिकांनी वचनबद्ध होणे नितांत गरजेचं वाटतं.

संदर्भ

१) भोळे भा.ल.,'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स ,नागपूर ,2003 .
२) वराडकर र.घ., 'भारतीय राज्यघटना मानवी हक्क व माहिती अधिकार कायदा', निराली प्रकाशन, पुणे ,2014 .
३) जाधव तुकाराम,' भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध ',खंड एक ,युनिक अकॅडमी ,पुणे, 2011 .
३) लोखंडे भगवान,' भारतीय संविधान स्वरूप व तत्वज्ञान 'दुर्वा एजन्सी, पुणे, 2021.
४) लोखंडे भगवान, ' भारतीय राजकारण आणि समकालीन प्रश्न ',दूर्वा एजन्सी, पुणे, 2021 .
४) व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, 'राज्यशास्त्र कोश,' दास्ताने प्रकाशन, पुणे, 1987.
५) पाटील बी.बी .,'भारतीय शासन आणि राजकारण' फडके प्रकाशन ,कोल्हापूर, 2012 .
६) के. सागर,' इंडियन पॉलिटी', के. सागर, पब्लिकेशन, पुणे, 2017 .
७) बंग के. आर. 'भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया', विद्या बुक्स पब्लिशर्स ,औरंगाबाद ,2011.
८) कुलकर्णी बी. वाय .,'भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया', एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, 2013.